दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.

माहितीचा अधिकार

जा.क्र.माअधि/अपिल/०३२/२०१७-१८
दि.१७/०३/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.कृष्णा सी. गुप्ता, ................अपिलार्थी
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.) ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.कृष्णा सी. गुप्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.१३/११/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) संगणक चालक पदासाठी कर्यरत असण्यास शासकीय नियमावलीची सत्यप्रत देण्यात यावी.
२) अस्थायी संगणक चालक यांची नावे व त्यांचे देयक कशाप्रकारे करते? याचा तपशिल देण्यात यावा.
३) कंत्राटी संगणक चालक यांची यादी व त्यांचे देयक कशाप्रकारे होते? याचा तपशिल देण्यात यावा.
४) संगणक चालक यांची नियुक्ती यादी विभागनिहाय देण्यात यावी.
५) संगणक चालकांचा प्रोविडेंट फंड भरलेल्या चलनाच्या सत्यप्रती देण्यात यावी व पी.एफ नंबर द्यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत चुकीची माहिती दिली असल्याने अपिलार्थी यांनी दि.१७/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१७/०३/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/२३५/२०१८ दि.२८/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.१३/११/२०१७ रोजीच्या पत्रानुसार मला चुकीची माहिती दिलेली आहे.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना मुद्दा क्र.२,३ व ४ ची माहिती दिलेली असुन मुद्दा क्र.१ ची माहिती उपलब्ध नाही. तसेच मुद्दा क्र.५ बाबतची माहिती ८ (त्र) अन्वये नाकारण्यात येत आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) मुद्दा क्र.२,३ व ४ बाबतची माहिती जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी दिल्याचे अपिलार्थी अर्जदार यांनी सुनावणी दरम्यान मान्य केले आहे. तसेच मुद्दा क्र.१ व ५ बाबतची माहिती, माहिती अधिकार कायद्यान्वये देता येत असेल तर ती माहिती सुधारित स्वरुपात १० दिवसांत विनाशुल्क स्वरुपात देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.कृष्णा सी. गुप्ता,
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.) ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना).

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.